# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश

जा.क्रसनिक/कक्ष-२/समससंमक/ प्राधिकृत अ./८१७/२०१७
सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था , ता.कन्नड
दिनांक :-१३/ ११/ २०१७

वाचा:-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)
२. सचिव, सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद यांचे पत्र दि.१०/११/२०१७

प्रस्तावना :-

ज्याअर्थी, सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदविण्यात आलेली असुन तिचा नोंदणी क्र. ऐजिडी/ पीआरडी/एल/५११/७९ दि.१६/०३/१९७९ असा असून सदर संस्थेचे कार्यक्षेत्र या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत आहे.

ज्याअर्थी, वाचा क्रमांक २ अन्वये सचिव, सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद यांचे पत्र दि.१०/११/२०१७ अन्वये या कार्यालयास लेखी कळविलेनुसार संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक दि. २१/११/२०१४ झालेली आहे.त्यामध्ये एकुण (१०) समिती सदस्य अविरोध निवडून आलेले होते त्या पैकी (०४) समिती सदस्यांनी त्यांचे वैयक्तीक अडचणीमुळे राजीनामे दिलेले आहेत त्यामुळे संस्थेचे संचालक मंडळ अल्प मतात आलेले आहे,त्यामळे आमच्या संस्थेचे फेर निवडणुक घेवून नविन संचालक मंडळाची निवडणुक घेण्यात यावी अशी विनंती या कार्यालयाकडे केलेले आहे.

ज्या अर्थी,सदर संस्थेचे समिती सदस्यांनी राजीनामे दिले असल्यामुळे संस्थेत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(१)(१-अ)(ब-१) नुसार संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे त्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे क्रमप्राप्त झाले आहे आणि,

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ(१)(१-अ)(ब-१) मधील तरतुदीनुसार संस्थेवर नवीन संचालक मंडळ गठीत होईपर्यंत संस्थेचे कामकाज पहाण्यासाठी संस्थेवर प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाल्याने याबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## :: आ दे श ::

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उमेशचंद्र प्र.हुशे,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,ता.कन्नड, सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद या संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अअन्वये दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. व्ही.बी.जाधव सहकार अधिकारी श्रेणी-२ संलग्न, सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था, ता.कन्नड जि. औरंगाबाद यांची नियुक्ती करीत आहे.

वरील प्राधिकृत अधिकारी यांचा कालावधी मा.राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण यांचेकडुन संस्थेची निवडणूक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत किंवा जास्तीत जास्त सहा महीने राहील. सदर कालावधीत प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेचे दैनंदिन कामकाज पहावयाचे आहे तसेच संस्थेची व्यवस्थापन समितीची निवडणूक घेण्याची प्रक्रिया तात्काळ सुरु करावयाची आहे. निवडणूकीनंतर नवनिर्वाचित समितीकडे पदभार तात्काळ हस्तातरं करावयाचा आहे.

सदरचा आदेश आज दिनांक १३ / ११/२०१७ रोजी माझ्या सही शिक्क्या निशी दिला आहे.

(उमेशचंद्र प्र.हुशे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,ता.कन्नड

प्रत- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. श्री. व्ही.बी.जाधव सहकार अधिकारी श्रेणी-२ संलग्न, सहाय्यक निबंधक , सहकारी संस्था, ता.कन्नड तथा प्राधिकृत अधिकारी,सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद यांना कळविण्यांत येत की, त्यांनी संस्थेचा पदभार तात्काळ घेऊन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. सचिव, सह्याद्री मजुर सहकारी संस्था,म.करंजखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद त्यांना कळविण्यांत येत की, त्यांनी त्यांचेकडे असलेले संस्थेचे दप्तराचा व मालमत्ताचा ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करावा.

सहाय्यक निबंधक